International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधन विकास : एक चिकित्सक अभ्यास

**सुशांत तांदळे[1], डॉ.सचिन हुदले[2]**
*[1]संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.*
*[2]सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,इस्लामपूर*
***Corresponding Author - सुशांत तांदळे***
**DOI - 10.5281/zenodo.10937620**

**सारांश:**

*या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधनाच्या बदलावर लक्ष केंद्रित करणे हा आहे. हा अभ्यास दुय्यम डेटा स्रोतांवर आधारित आहे. डेटा विश्लेषण करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट एक्सेलचा वापर करण्यात आला आहे. पशुधन हा देखील भारतातील शेतीचा अविभाज्य घटक आहे. गुरांचा उपयोग शेतात नांगरणी आणि पिकांची वाहतूक करण्यासाठी केला जातो, तर इतर प्राण्यांचा वापर खतासाठी आणि इंधनाचा स्रोत म्हणून केला जातो. पशुधन भारतातील लाखो लोकांसाठी, विशेषतः ग्रामीण भागात उपजीविका प्रदान करते. अनेक शेतकरी उत्पन्नासाठी, तसेच अन्न आणि इतर साधनांसाठी पशुधनावर अवलंबून असतात. गायींना अनेक शेतकरी पवित्र मानतात आणि अनेकदा त्यांना संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. म्हैस, शेळ्या, मेंढ्या यासारखे इतर प्राणीही आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहेत. बैल व गाई यांच्यात आजरा, बावडा, चंदगड, शाहूवाडी वगळता इतर तालुक्यात धनात्मक बदल झालेला आहे तर म्हशीच्या बाबतीत भुदरगड, चंदगड, राधानगरी वगळता इतर तालुक्यात ऋणात्मक बदल झालेला दिसून येतो.*

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश असून भारतामध्ये विविध प्रकारच्या पशुधनाचा शेतीसाठी वापर केला जातो. त्याचप्रमाणे जोडधंदा म्हणून पशुपालन देखील केले जाते. पशुधन हा एक उदयोन्मुख बाजाराभिमुख व्यवसाय आहे जो सध्या जागतिक स्तरावर १.३ अब्ज लोकांना रोजगार प्रदान करतो. तसेच विकसनशील देशांमधील जवळजवळ ६० कोटी आर्थिक दुर्बल अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उपजीविकेचे साधन म्हणून याकडे पाहिले जाते. लहान-लहान शेतीमध्ये पिकांची लागवड करण्यासाठी प्राणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पशुधन उत्पादनामुळे नैसर्गिक संसाधने, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक समानता आणि आर्थिक प्रगतीवर फायदेशीर आणि प्रतिकूल परिणाम होऊ शकतात (जागतिक बँक 2009). विकसनशील राष्ट्रांमध्ये पशुधन शेती जलदगतीने वाढत आहे. त्यामुळे तेथील कृषी क्षेत्राचा विस्तार मोठ्याने होत आहे.

भारत देशात जागतिक स्तरावर सर्वात जास्त पशुधन आहे आणि ते देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि उपजीविकेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पशुधन उत्पादन हा भारतीय शेतीचा कणा आहे आणि शतकानुशतके ग्रामीण भागात रोजगाराचा स्रोत आहे, संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था त्याच्याभोवती फिरत आहे. पशुधन हे भारतीय शेतीचा अविभाज्य घटक बनला आहे. २० वी पशुगणना दर्शवते की भारतात ५३५.७८ दशलक्ष पशुधन आहे, तर एकूण पशुधन संख्येपैकी ३३ दशलक्ष पशुधन एकट्या महाराष्ट्रात आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

कोल्हापूर हा महाराष्ट्रातील महत्वाचा जिल्हा व तो महाराष्ट्राच्या दक्षिण भागात वसलेला आहे. कोल्हापूर जिल्हा अक्षांश 15°73’ ते 17°11’ व रेखांश 73°75’ ते 74°70’ दरम्यान पसरलेला आहे. कोल्हापूर ची समुद्र सपाटी पासूनची उंची 546 मीटर असून सह्याद्री पठाराशी सानिध्य असलेला पूर्वेकडे उतार लागला असलेने जिल्ह्यातील वातावरण असे बनलेले आहे की जे दुष्काळ व टंचाई पासून दूर आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे वातावरण थंडही नाही व उष्णही नाही ते आल्हाददायक असे आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्वेस व उत्तरेस सांगली जिल्हा, पश्चिम-उत्तरेस रत्नागिरी जिल्हा, पश्चिम-दक्षिणेस सिंधुदुर्ग जिल्हा, दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हा वसलेले आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ 7685 चौ.किमी. आहे. 2011 च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्ह्याची लोकसंख्या 38,75,001 आहे.

प्रशासकीय दृष्ट्या, कोल्हापूर जिल्हा बारा तालुक्यांमध्ये विभागलेला आहे; ते पुढीलप्रमाणे आजरा, करवीर, कागल, गगनबावडा, गडहिंग्लज, चंदगड, पन्हाळा, भुदरगड, राधानगरी, शाहूवाडी, शिरोळ, हातकणंगले. कोल्हापूर जिल्ह्यातील पूर्वेकडील भागात कोरडे तर पश्चिम घाटातील भागांत थंड हवामान असते. जिल्ह्यात पाऊस मुख्यपणे जून ते सप्टेंबर या काळात नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे मिळतो, एप्रिल आणि मे महिन्यांत वळीवाचा पाऊसही पडतो. जिल्ह्यातील पश्चिमेकडील भागात पावसाचे प्रमाण जास्त आहे.

**उद्दिष्ट:**

१. कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधनवाढीचा अभ्यास करणे.

**अभ्यास पध्दती:**

संपूर्ण संशोधन कार्य दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित आहे. कोल्हापूर जिल्ह्याचा १९ वा पशुधन गणना अहवाल सन २०१२ आणि २० वा पशुधन गणना अहवाल सन २०१९ या जिल्हा जनगणना हस्तपुस्तकांमधून दुय्यम डेटा प्राप्त केला आहे. तसेच पशुधन विभाग पंचायत समिती व जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून संबंधित माहिती संकलित केली आहे. मायक्रोसॉफ्ट एक्सेल डेटा प्रक्रिया आणि विश्लेषण करण्यासाठी वापरले आहे.

विश्लेषणात्मक अभ्यासासाठी खालील सूत्र वापरले आहे.

वाढीचा दर:

$$\textbf{PR} = \frac{V\ present - V\ past}{V\ past} * 100$$

PR =percent change

$V_{present}$ =Present Value

$V_{Past}$ =Past Value

2012 मधील 19 व्या पशुगणनेतून आणि 2019 मधील 20 व्या पशुगणनेतून मागील वर्षांतील पशुधनाच्या लोकसंख्येची माहिती संकलित करण्यात आली. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, Indiastat.com वेबसाइट , तसेच पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रकाशनांचा पशुधनाशी संबंधित डेटा मिळविण्यासाठी उपयोग केला.

## विश्लेषण

### कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधनाचा आढावा

### अ) पशुधन (पशुगणना वर्ष २०१२)

2014-15 कालावधी दरम्यान, पशुधन क्षेत्राचा निरंतर विकास आणि विस्तार व्हावा यासाठी राष्ट्रीय पशुधन अभियान (NLM) ची स्थापना करण्यात आली. या उपक्रमाच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये उत्कृष्ट खाद्य आणि चाऱ्याची उपलब्धता वाढवणे, जोखमीपासून संरक्षण करणे, विविध आवश्यक सेवांमध्ये सुधारणा करणे, कर्जाची उपलब्धता वाढवणे आणि पशुपालक शेतकऱ्यांचे कार्य सुव्यवस्थित करणे यांचा समावेश आहे. (वार्षिक अहवाल-2021-22).

**Table:1 पशुगणना वर्ष २०१२**

| Sr. No. | Taluka | Percentage of Livestock Population (Year 2012) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Cattle (%) | Buffalo (%) | Sheep (%) | Goat (%) | Pig (%) | Horse & Ponies (%) | Donkey (%) |
| 1 | Ajra | 3.31 | 4.58 | 0.03 | 7.56 | 0.04 | 0.22 | 0 |
| 2 | Bavda | 1.31 | 1.61 | 0.01 | 2.12 | 0.00 | 0.00 | 0 |
| 3 | Bhudargad | 4.10 | 5.71 | 2.89 | 5.73 | 0.00 | 0.61 | 0 |
| 4 | Chandgad | 8.61 | 7.15 | 0.63 | 8.06 | 0.00 | 0.00 | 0 |
| 5 | Gadhinglaj | 6.82 | 9.20 | 14.64 | 12.59 | 0.07 | 10.47 | 0 |
| 6 | Hatkanagale | 11.91 | 11.32 | 29.02 | 9.97 | 85.61 | 26.78 | 0 |
| 7 | Kagal | 10.90 | 9.81 | 23.05 | 8.18 | 0.00 | 13.94 | 0 |
| 8 | Karvir | 15.41 | 14.99 | 10.76 | 9.65 | 6.79 | 18.29 | 34.12 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Panhala | 10.88 | 9.76 | 3.41 | 7.44 | 0.00 | 1.54 | 0 |
| 10 | Radhanagari | 7.57 | 7.37 | 0.57 | 5.50 | 0.00 | 1.65 | 0 |
| 11 | Shahuwadi | 9.09 | 8.64 | 2.63 | 15.29 | 0.00 | 4.30 | 0 |
| 12 | Shirol | 10.09 | 9.85 | 12.35 | 7.89 | 7.49 | 22.20 | 65.88 |
| | Total | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.00 | 100.00 |

*Source: 19th livestock population census 2012.*

Table 1 मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बारा तालुक्यातील पशुधनाविषयी माहिती दिली आहे; ज्यामध्ये बैल व गाय,म्हैस, शेळी, मेंढी, डुक्कर, घोडे व गाढव यांची 2012 सालची पशु गणना दर्शवली आहे.करवीर या तालुक्यामध्ये बैल व गाय यांची संख्या सर्वाधिक 15.42 %आहे तर बावडा तालुक्यात सर्वात कमी 1.31% इतकी आहे. करवीर व हातकणंगले या तालुक्यांमध्ये म्हशींचे प्रमाण 10% हून अधिक पहावयास मिळते. त्या खालोखाल शिरोळ, कागल व गडहिंग्लज या तालुक्यांमध्ये म्हशींचे प्रमाण अनुक्रमे 9.85%, 9.76% व 9.20% इतके आहे. हातकणंगले, कागल व गडहिंग्लज या तालुक्यांमध्ये शेळ्याची संख्या सर्वाधिक आहे आणि आजरा व बावडा तालुक्यांत सर्वात कमी आहे .शाहूवाडी, गडहिंग्लज, हातकणंगले, करवीर व कागल या तालुक्यातील मेंढी पालनाचे प्रमाण 55.68% आहे. तर उर्वरित तालुक्यांमध्ये ते 44.32% इतके आढळते. हातकणंगले या एकाच तालुक्यात सुमारे 85.61% इतके वराह पालन केले जाते. उर्वरित 14.39% वराह पालन हे शिरोळ, करवीर, गडहिंग्लज आणि आजरा या तालुक्यात केले जाते. हे पाच तालुके वगळता इतर तालुक्यात वराह पालन दिसून येत नाही. घोडा हा शेतकऱ्यांना उपयुक्त असा प्राणी आहे. हातकणंगले तालुक्यात 26.78%, शिरोळ तालुक्यात 22.20 %, करवीर तालुक्यात 18.29%, कागल तालुक्यात 13.94% तसेच भुदरगड तालुक्यात सर्वात कमी म्हणजे 0.61% इतके घोडे आढळून येतात. गाढव हा शेतकऱ्यांना तसेच इतर कामगार वर्गाला कामी येणारा उपयुक्त असा प्राणी होय. सुमारे 65.88% गाढवांची संख्या एकट्या शिरोळ तालुक्यात आहे. करवीर तालुक्यात 34.12% गाढवे आहेत. इतर कोणत्याही तालुक्यात गाढवांची संख्या पहावयास मिळत नाही. सन 2012 च्या 19 व्या गणनेनुसार करवीर तहसीलमध्ये सर्वाधिक पशुधन आणि बावडा तहसीलमध्ये खूपच कमी पशुधन आहे.

**ब) पशुधन (पशुगणना वर्ष २०१९)**

**Table: 2 पशुगणना वर्ष २०१९**

| Sr.No. | Taluka | Percentage of Livestock Population (Year 2019) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Cattle (%) | Buffalo (%) | Sheep (%) | Goat (%) | Pig (%) | Horse & Ponies (%) | Donkey (%) |
| 1 | Ajra | 2.46 | 4.89 | 0.66 | 6.96 | 0 | 0.84 | 0 |
| 2 | Bavda | 1.09 | 1.70 | 0.00 | 1.72 | 0 | 0.11 | 0 |
| 3 | Bhudargad | 4.05 | 6.34 | 0.36 | 5.84 | 0 | 1.69 | 0 |
| 4 | Chandgad | 7.00 | 8.24 | 0.74 | 5.56 | 0 | 0.00 | 0 |
| 5 | Gadhinglaj | 6.63 | 9.45 | 9.87 | 17.57 | 0 | 7.91 | 0 |
| 6 | Hatkanagale | 12.02 | 9.28 | 18.55 | 10.44 | 67.99 | 26.27 | 0 |
| 7 | Kagal | 12.38 | 9.95 | 22.19 | 11.55 | 1.49 | 22.89 | 0 |
| 8 | Karvir | 17.05 | 14.84 | 26.90 | 11.18 | 1.86 | 6.12 | 0 |
| 9 | Panhala | 12.69 | 10.13 | 3.25 | 6.51 | 0 | 2.53 | 0 |
| 10 | Radhanagari | 7.71 | 7.96 | 7.62 | 3.32 | 26.05 | 6.86 | 0 |
| 11 | Shahuwadi | 6.66 | 8.28 | 1.72 | 9.24 | 0 | 0.63 | 100 |
| 12 | Shirol | 10.26 | 8.93 | 8.13 | 10.12 | 2.61 | 24.16 | 0.00 |
| | Total | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |

***Source: 20th livestock population census 2019*.**

Table no. 2 मध्ये 2019 सालची पशु गणना दर्शवली आहे. सदर पशुगणनेनुसार करवीर तालुक्यात बैल व गाई यांची संख्या 2012 च्या पशुगणनेप्रमाणे सर्वाधिकच (17.05) आहे. त्या खालोखाल पन्हाळा, कागल, हातकणंगले, आणि शिरोळ या तालुक्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित तालुक्यांमध्ये 7% पेक्षा कमी बैल व गाई यांची संख्या आहे. म्हशींचे प्रमाण 10% पेक्षा जास्त करवीर व पन्हाळा या दोन तालुक्यात आहे. बावडा तालुक्यात सर्वात कमी म्हशींचे प्रमाण आहे. सर्वाधिक मेंढी पालन करवीर तालुक्यात तर सर्वात कमी भुदरगड तालुक्यात पाहावयास मिळते. बावडा या तालुक्यात मेंढी पालन दिसून येत नाही. शेळीपालन सर्वाधिक असणाऱ्या शाहूवाडी ची जागा गडहिंग्लज तालुक्याने घेतलेली पाहावयास मिळते. गडहिंग्लज तालुक्यात 17.57% इतक्या शेळ्या आहेत.10% पेक्षा जास्त शेळ्याअसणारे कागल, करवीर, हातकणंगले आणि शिरोळ हे तालुके आहेत. सर्वात कमी शेळीपालन बावडा तालुक्यात (1.72%) आढळते. फक्त पाच तालुक्यांमध्ये वराह पालन आढळते ज्यामध्ये सर्वाधिक हातकणंगले 67.99% त्या खालोखाल राधानगरी 26.05%, शिरोळ 2.61%, करवीर 1.86%, कागल 1.49%यांचा समावेश होतो. इतर तालुक्यात वराह पालन आढळून येत नाही. सर्वाधिक म्हणजेच 26.27% घोडे हातकणंगले

तालुक्यात आहेत. 2012 मध्ये बावडा तालुक्यात घोडे आढळून येत नाहीत परंतु 2019 च्या पशुगणनेप्रमाणे त्याचे प्रमाण 0.11% इतके आहे .गाढवांची संख्या फक्त एकट्या शाहूवाडी तालुक्यामध्ये (100%)दिसून येते. इतर कोणत्याही तालुक्यामध्ये गाढवांची संख्या दिसून येत नाही.

**कोल्हापूर जिल्ह्यातील पशुधन वाढ (2012 ते 2019)**

पशुधन वाढ म्हणजे एका विशिष्ट कालावधीत त्या प्रदेशात आढळलेल्या गुरांच्या संख्येत होणारा बदल. ही वाढ किंवा बदल सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकते. अभ्यास क्षेत्रातील पशुधन वाढीच्या विश्लेषणामुळे तेथे असणाऱ्या पशुधन संरचनेचे आकलन होते.पशुधन वाढीचा भौगोलिक अभ्यास तसेच प्रादेशिक आणि स्थानिक स्तरावर त्याची गतिशीलता आणि नियोजन जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत नियोजनकर्त्यांना या प्रदेशातील पशुधन वाढीच्या दराची जाणीव होत नाही तोपर्यंत कोणतेही नियोजन यशस्वी होऊ शकत नाही. कोल्हापूर जिल्ह्याच्या तहसीलनिहाय पशुधन वाढीचे वर्णन तक्ता 1.3 मध्ये केले आहे.

**Table: 3 पशुधन वाढ (2012 ते 2019)**

| Sr.No. | Taluka | Growth in Percentage(2012 to 2019) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Cattle | Buffalo | Sheep | Goat | Pig | Horse & Ponies | Donkey |
| 1 | Ajra | -23.41 | -0.84 | 2093.10 | -26.27 | -100 | 100.00 | 0 |
| 2 | Bavda | -14.30 | -1.97 | -83.33 | -35.18 | 0 | - | 0 |
| 3 | Bhudargad | 1.83 | 2.95 | -88.46 | -18.54 | 0 | 45.45 | 0 |
| 4 | Chandgad | -16.17 | 6.88 | 7.11 | -44.80 | 0 | 0.00 | 0 |
| 5 | Gadhinglaj | 0.29 | -4.70 | -37.69 | 11.67 | -100 | -60.53 | 0 |
| 6 | Hatkanagale | 4.10 | -23.90 | -40.95 | -16.18 | -86.06 | -48.77 | 0 |
| 7 | Kagal | 17.11 | -5.92 | -11.09 | 12.99 | - | -14.23 | 0 |
| 8 | Karvir | 14.09 | -8.08 | 130.90 | -7.34 | -95.19 | -82.53 | -100 |
| 9 | Panhala | 20.17 | -3.68 | -12.12 | -30.02 | 0 | -14.29 | 0 |
| 10 | Radhanagari | 5.00 | 0.27 | 1130.92 | -51.71 | - | 116.67 | 0 |
| 11 | Shahuwadi | -24.48 | -11.00 | -39.54 | -51.67 | 0 | -92.31 | - |
| 12 | Shirol | 4.81 | -15.89 | -39.14 | 2.64 | -93.89 | -43.18 | -100 |

*Source: Compiled by Researcher*

तक्ता 1.3 मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यात पशुधनाची झालेली वाढ दर्शवली आहे. काही तालुक्यात यात धनात्मक तर काही तालुक्यात यात ऋणात्मक बदल झालेला दिसून येतो. आजरा, बावडा, चंदगड, शाहूवाडी या तालुक्यात बैल आणि गाई यांच्या संख्येत

ऋणात्मक बदल झालेला आहे. तर इतर तालुक्यात धनात्मक बदल झालेला दिसतो. म्हशींचे प्रमाण केवळ भुदरगड, चंदगड राधानगरी तालुक्यात वाढलेले आहे. इतर तालुक्यात ते प्रमाण कमी झाले आहे. आजरा व राधानगरी तालुक्यात मेंढ्यांची संख्या आश्चर्यकारकरीत्या वाढलेली आहे. करवीर व चंदगड या तालुक्यात मेंढ्यांच्या संख्येत धनात्मक बदल तर इतर सर्व तालुक्यांत ऋणात्मक बदल झालेला आहे. कागल, गडहिंग्लज आणि हातकणंगले तालुके वगळता इतर तालुक्यात शेळ्यांची घट झाल्याचे आढळते. ज्या तालुक्यात वराह पालन आढळते तेथे त्यांची संख्या कमी झालेली आहे. घोड्यांची आकडेवारी पाहिली असता काही तालुक्यात धनात्मक तर काही तालुक्यात ऋणात्मक बदल झालेला आहे. गाढवांची संख्या केवळ ऋणात्मक बदल झालेला आहे.

**निष्कर्ष**:

कोल्हापूर जिल्हयाची ग्रामीण अर्थव्यवस्था पशुसंवर्धनावर मुलतः अवलंबुन आहे. ग्रामीण भागामध्ये शेतीची कामे करण्यासाठी विविध पशुधन वापरले जाते. परंतु सध्याच्या काळात विविध यंत्रांचा वापर करून शेती केली जात आहे. ग्रामीण भागातील कुटुंबाचे अर्थार्जन हे दुग्धव्यवसायवर अवलंबून आहे. त्यामुळेच काही पशुधनामध्ये धनात्मक बदल दिसतो तर काही पशुधनामध्ये ऋणात्मक बदल दिसून येतो. बैल व गाई यांच्यात आजरा, बावडा, चंदगड, शाहूवाडी वगळता इतर तालुक्यात धनात्मक बदल झालेला आहे तर म्हशीच्या बाबतीत भुदरगड, चंदगड, राधानगरी वगळता इतर तालुक्यात ऋणात्मक बदल झालेला दिसून येतो. एकंदरीत पाहता शेळ्या व मेंढ्यांच्या संख्येत नकारात्मक बदल झालेला आहे. तसेच वराह, घोडे व गाढव यांची देखील परिस्थिती याहून वेगळी नाही त्यांच्या संख्येतही नकारात्मक बदल झालेला पहावयास मिळत आहे.

**संदर्भ**:

1. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२३ कोल्हापूर जिल्हा
2. Report on 19th Livestock census – 2012 Maharashtra state
3. 20th Livestock & Poultry census – 2019, Maharashtra state
4. S. K. Das (2022), Status of Animal Husbandry in Maharashtra, Acta Scientific Veterinary Science (ISSN:2582-3183), Vol.4, Isssu.1
5. Kolhapur District Survey Report – 2020-2021